दि. ११ फेब्रुवारी २०११

मा. सभापती महोदय,

ठाणे महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ९५ अन्वये सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरीता ठाणे महानगरपालिकेचे अर्थसंकल्पाच्या बाबतीतील उत्पन्न आणि खर्चाचे अंदाज स्थायी समितीस सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे.

ठाणे महानगरपालिकेतील माझ्या कारकिर्दीतला हा पहिला अर्थसंकल्प आहे. ठाणे शहर १३ व्या शतकापर्यंत 'श्री स्थानक' या नावाने ओळखले जात होते. हे शहर निसर्गतः सौंदर्याने नटलेले असून पश्चिमेस येऊरची वनराई असून पुर्वेस पारसिक डोंगर, खाडी किनारा आहे. या शहरात नारळ, वड, जांभूळ, करंज इत्यादी झाडे पुराण काळापासून असल्याबाबत ठाण्याचा इतिहास सांगतो. ठाण्याची रचना, ठेवण मुळातच पर्यावरणाभिमुख आहे. त्याचे संवर्धन करणे ही आपली सामुहिक जबाबदारी असून आधुनिक काळातील वेगवान विकासामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडू नये म्हणून सर्व स्तरावरील प्रदुषण रोखण्यासाठी व पर्यावरणाभिमुख मूलभूत सुविधांबाबतीत विविध प्रकल्प राबविण्याचा व त्यायोगे पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात करण्यांत आला आहे.

दहा वर्षापुर्वी ठाण्याची लोकसंख्या सुमारे १२ लक्ष होती ती आता सुमारे १८-२० लक्ष पर्यंत पोहचलेली आहे. वर्ष २००१ नंतर शहरात मोठया प्रमाणात रस्त्याच्या रुंदीकरणाची कामे करण्यात आल्यामुळे शहरात मोठी गृहसंकुले व इमारती विकसित झाल्या, आणि लोकसंख्या १० वर्षात झपाटयाने वाढली. पुर्वीच्या वाहतुकीच्या संख्येतही

कितीतरी पटीने वाढ झाली आणि त्यामुळे प्रदुषणामध्ये सुध्दा वाढ झाली आहे. वाहनांच्या वाढत्या संख्येकडे पहाता त्यासंबंधी पार्कींग व इतर यंत्रणेची सुधारणा आवश्यक आहे. पादचा-यांकरीता नियोजन, रस्त्यांचे नियोजन व डिझाईन तयार करण्याचे "डिएनए" आहे. एका पादचा-याला ५ चौ.फूट जागा उभे राहण्यासाठी व १० चौ.फुट जागा चालण्यासाठी लागते. एका कारला ३०० चौ.फूट जागा उभे राहण्याकरीता व कमीत कमी ३००० चौ.फूट चालतांना प्रती तास लागते. मागील वर्षभरात सुमारे २३,००० कार ठाण्यातील रस्त्यात आल्या आहेत. या सर्व बाबीचा विचार होणे आवश्यक आहे. मुंबई शहराची उपनगरी म्हणून ठाण्यात लोकसंख्या वाढत गेली. जुन्या ठाण्यात तर गर्दी वाढलीच त्यासोबत घोडबंदर रोडवरील नवीन ठाणे ने आकार घेतला व पुर्ण ठाण्याचे स्वरुप बदलत गेले. आज आवश्यकता आहे अशा विकासाचा मार्ग अवलंबण्याचा ज्यामुळे या शहराला एक ’जिवंत’ शहर म्हणून ओळख मिळेल व जिथे जीवनमानात निरंतर सुधारणा हे ठाणे महापालिकेचे उद्दिष्ट असेल.

नागरिकांचे जीवनमान उँचविण्यासाठी आवश्यकती उपाययोजना जसे चांगले रस्ते व पदपथ, सार्वजनिक वाहतुक व्यवस्था, उद्यान विकास व वृक्षारोपण, तलाव संवर्धन, सायकल ट्रॅक, उच्चस्तरीय शिक्षण, स्वच्छ व मुबलक पाणी पुरवठा, उत्तम सार्वजनिक आरोग्य सुविधा दिल्याने ठाणे शहर हे ’सस्टेनेबल’ (Sustainable) शहर म्हणून विकसित होईल. त्या अनुषंगाने सदर अर्थसंकल्पात हरित विकास प्रकल्प, हरित जनपथ विकास प्रकल्प, पर्यावरण संवर्धन याचा समावेश करण्यांत आलेला आहे. हा अर्थसंकल्प लोकाभिमुख करण्याचे प्रयत्न केले असून सुमारे ८०% जनता ही सार्वजनिक वाहतुक सुविधेचा वापर करतात या लोकानां सहज सुलभतेने वाहतुक सुविधा उपलब्ध होणेसाठी

"श्री स्थानक लोकमार्ग प्रकल्प" (बी.आर.टी.एस.) हाती घेण्याचा मनोदय आहे. खेळांडूना उत्तम दर्जाचे प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन व भविष्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करण्यासाठी आधुनिक दर्जाचे क्रिडाप्रेक्षागृह व प्रशिक्षण केंद्र उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

वातावरणातील धुळीकणांची मात्रा आर.एस.पी.एम. १०० क्यूबीक मीटरपेक्षा कमीत कमी राखण्यासाठी विकासकांना बांधकाम साहित्याची वाहतूक करतांना वातावरणात धुळीकण कमीत कमी निर्माण व्हावेत म्हणून आवश्यक उपाय योजना करण्याबाबत व दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यांत येतील व तसेच रस्त्यावरचे धूलीकण कमी करण्यासाठी नियमितपणे महिन्यात कमीत कमी एकदा शहराचे सर्व रस्ते न पिण्यायोग्य पाण्याचा वापर करुन धुतले जावेत, असे योजिले आहे.

त्यासोबत भविष्यकाळात शहराच्या विकासासाठी जी काही तरतूद केली जाईल, ती तरतूद 'Transformative Investments' च्या स्वरुपाने व्हावेत यासाठी भविष्यकालीन योजना सुचविण्यात येत आहे.

## (१) सन २०१०-११ मधील संक्षिप्त आढावा

जागतिक आर्थिक मंदीच्या भारतीय अर्थव्यवस्थेवर जरी परिणाम झाला असला तरी, ठाणे महापालिकेच्या इतिहासात महापालिका उत्पन्नात कधी नव्हे इतकी २९% वाढ झालेली आहे. ब-याच वेळा मूळ अर्थसंकल्पात धरण्यांत आलेला स्वतःचे महसुलात काही कारणास्तव घट येते. परंतु प्रथमच मूळ अर्थसंकल्पापेक्षा सुधारित अर्थसंकल्पात

महापालिकेचे उत्पन्न रु.९७ कोटीने वाढ होणार आहे, असे सांगण्यास मला खूप आनंद होत आहे.

महापालिकेच्या उत्पन्नाचे मूळ अंदाज रु.८८४.१० कोटी अपेक्षित करण्यांत आले होते. प्रत्यक्षात वसुलीचा अंदाज रु.९८१.८३ कोटी असून एकूण वाढ रु.९७ कोटी होणार आहे. त्यामध्ये ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत : -

**जकात वसुली :-**

सन २०१०-११ करीता जकातीपासून रु.४२४ कोटी उत्पन्नाचा अंदाज करण्यांत आला होता. हयाच वर्षी जकात विभागाचे "बांधा वापरा हस्तांतरण करा" तत्वावर संगणकीकरण करुन पर्याप्त जकात वसूल करण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला असून जकात चोरीवर प्रभावीपणे नियंत्रण आणून पहिल्यांदाच मूळ अंदाजापेक्षा रु.१७ कोटीने वाढ करुन सुधारित अंदाज रु. ४४१ कोटी करण्यांत आला आहे. सन २००९-१० च्या तुलनेत सदरचे उत्पन्न १७.१९% ने जास्त आहे.

**विकास व तत्सम कराची वसुली :-**

शहर विकास विभागाकडून रु. ९०.२५ कोटी उत्पन्न अपेक्षित केले होते. यामध्ये रु. ५९.४६ कोटी इतकी भरीव वाढ होऊन सुधारित अपेक्षित उत्पन्न रु. १४९.७१ कोटी करण्यांत आले आहे.

**रस्ता खोदाई फी वसुली :-**

सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रस्ता फोड फी मध्ये रु. २२ कोटी अपेक्षित केले होते. त्यात रु. ४५ कोटीने वाढ होऊन रु.६७ कोटी सुधारित उत्पन्न अपेक्षित करण्यांत आली आहे.

**अग्निशमन विभागाकडून वसुली :-**

अग्निशमन दलापोटी रु. १२.४१ कोटी मूळ अंदाजपत्रकात अपेक्षित धरण्यांत आले होते. कॅपिटेशन फी व छाननी फी मध्ये रु.४.२० कोटी वाढ होऊन सदरचे अंदाज रु.१६.६१ कोटी करण्यांत आले आहे.

**मालमत्ता कर :-**

मालमत्ता करामध्ये मूळ अंदाज रु.१९२.२६ कोटी अपेक्षित होते. जरी सुधारित अर्थसंकल्पात तरतूद रु. १७.४० कोटी कमी केली असली तरी सन २००९-२०१० च्या तुलनेत सदरचे उत्पन्न १८.१७ % ने जास्त आहे.

**सन २०१०- ११ मध्ये पुर्ण करण्यांत आलेले प्रकल्प**

**१) अल्मेडा रोड व पूर्व द्रूतगती मार्ग जंक्शन भुयारी पादचारी मार्ग**
**२) ठाणे वस्तुसंग्रहालय**
**३) मुंब्रा शाळा**
**४) जकात नाक्याचे संगणकीकरण**
**५) पोखरण रोड नं. २ वर वाहनतळ .**
**६) मुंब्रा रस्ता बायपास पासून ते कल्याण फाटा पर्यंत सिमेंट काँक्रीटीकरण**
**७) समतानगर रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण**
**८) लेनीननगर, वर्तकनगर रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण**
**९) सर्वोदय उद्यान, कोपरी सुशोभीकरण**
**१०) रेवाळे तलाव, मानपाडा सुशोभीकरण**
**११) खारीगांव तलाव सुशोभीकरण**
**१२) महापालिका मुख्यालयात ५ किलो वॅट क्षमतेची सौर ऊर्जेवर आधारित वीज**

**निर्माण करणारी यंत्रणा**

**१३) महिला उद्योग केंद्र, माजिवाडा**

**१४) महाराष्ट्र नगर प्रसुतिगृह, वर्तकनगर**

**१५) क्रिडा संकुल, सर्व्हिस रोड, वर्तकनगर**

**१६) ठाणे विज्ञान केंद्र, माजिवाडा**

**१७) बहुउद्देशीय हॉल पोखरण रोड नं. २ वर्तकनगर**

**१८) बी.एस.यु.पी योजनेखाली १५४४ सदनिका पुर्ण**

**१९) जेष्ठ नागरिकांसाठी सुविधा केंद्र, मानपाडा**

**२०) कोपरी पादचारी पुल.**

**२१) दोन नाना- नानी पार्क, माजिवडा येथे**

**२२) रोड नं. २१ व २१ आर रस्त्यांचे सिमेंट कॉन्क्रीटीकरण.**

**२३) एकात्मिक नाला विकास प्रकल्प टप्पा क्र.I, II व III**

यासोबत असे सुध्दा नमूद करावेसे वाटते की, जे.एन.एन.यू.आर.एम. अंतर्गत बी.एस.यू.पी. व मलनिस्सारण प्रकल्पात भूमी संपादन व निविदा प्रक्रियेस लागलेला विलंब तसेच पावसाळा लांबल्यामुळे झालेल्या विलंबामुळे अपेक्षित प्रगती होऊ शकली नाही, याबाबत खंत वाटते.

## (२) सन २०११-१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज

या पार्श्वभूमीवर मी आता सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये प्रस्ताविलेली ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे सादर करीत आहे :-

सन २०११- १२ चा अर्थसंकल्प तयार करतांना प्रामुख्याने मूलभूत सोयी सुविधांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला असून भांडवली कामांसाठी गरजेच्या क्रमाने निधीची उपलब्धता करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच काही नवीन

प्रकल्प घेण्याचा सुद्धा प्रयत्न आहे. शहरातील जनतेच्या मागण्या भरपूर असतात परंतु निधीची उपलब्धता ही बाब विचारात घेऊन गरजांचा प्राधान्य क्रम ठरवून निधीचे नियोजन करावे लागते. हया वर्षात सहावा वेतन आयोग अधिकारी व कर्मचा-यांना लागू केल्यावर थकबाकी सोबत पगारवाढ देण्यात येणार असल्याने महसूली खर्चात वाढ झालेली आहे.

सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाचा संक्षिप्त तपशिल पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| आरंभिची शिल्लक | रु. | ६४.०१ कोटी |
| महसुली उत्पन्न | रु. | १११३.३३ कोटी |
| अनुदाने | रु. | २९७.२६ कोटी |
| जेएनएनयुआरएम अंतर्गत कर्ज | रु. | २५४.६० कोटी |
| बीएसयुपी लाभार्थी हिस्सा | रु. | ७.०३ कोटी |
| **एकूण जमा** | **रु.** | **१७३६.२३ कोटी** |
| महसुली खर्च | रु. | ७०२.५८ कोटी |
| अ अंदाज भांडवली खर्च | रु. | ५७४.५७ कोटी |
| क अंदाज भांडवली खर्च | रु. | ६३.६० कोटी |
| जेएनएनयुआरएम भांडवली खर्च | रु. | ३९५.३० कोटी |
| अखेरची शिल्लक | रु. | ०.१८ कोटी |
| **एकूण अंदाजखर्च** | **रु.** | **१७३६.२३ कोटी** |

**सदर अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे**

- **कोणतीही करवाढ नसलेला अर्थसंकल्प**
- **पर्यावरणाचा समतोल राखण्यावर भर**
- **भांडवली कामांसाठी तरतूद रु.७२६ कोटी वरुन रु.१०३३ कोटीची म्हणजेच ४२% ने वाढ**
- **सार्वजनिक वाहतूक आणि त्या संबंधी पायाभूत सुविधा राबविण्यासाठी प्रयत्न**
- **शहरात चांगले पदपथ व सायकल ट्रॅक चा विकास**

- नागरिकांच्या विरंगुळयासाठी व मनोरंजनासाठी अंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा.
- घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प हाती घेणे.
- शहराची स्वच्छता वाढविण्यावर भर व शहराचा 'ग्रीन कव्हर' वाढविण्यावर भर.
- आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण करणेसाठी प्रशिक्षण व्यवस्था
- आरोग्य रक्षण व वैद्यकीय सुविधा सक्षमीकरणासाठी भरघोस तरतूद
- शाळा इमारत बांधण्याचे कार्यक्रमावर भर
- शहरातील मंडईंचा विकास
- फेरीवाल्यांसाठी विशेष मार्केट व्यवस्था
- तलाव सौदर्यीकरण व जलसाठयांचे सर्वधनांवर भर
- कळवा खाडीवरील जुन्या कालबाहय झालेल्या पुलाचे पुर्नबांधकाम
- कोपरी व विटावा येथे पुल व अंडरपासचे बांधकाम
- राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी व पदविका अभ्यासक्रम सुरु करणे.
- शहरात जागोजागी पार्किंगची आधुनिक सुविधा निर्माण करणे.
- शहरात वेगवेगळया रस्त्यांच्या विकासासाठी आवश्यक तरतूद
- भविष्यकालीन प्रकल्पांच्या नियोजनासाठी तरतूद

## ३. सन २०११- १२ चे अर्थसंकल्पातील महत्वाच्या उत्पन्नाचे स्त्रोत

**३.१ भांडवली मुल्यावर कर आकारणी**

भांडवली मुल्यानुसार कर आकारणी लागू करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय, १९४९ मध्ये कर नियमावली तसेच कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासुन शासन निर्णयान्वये भांडवली मुल्य निश्चित करुन कर आकारणीबाबत मा.महासभेच्या मान्यतेने सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासुन करण्याचे प्रस्तावित आहे. सुधारणा

करतांना मालमत्तेचा कर निर्धारण स्वतः मालमत्ताधारक करु शकणार यासाठी स्वंयमुल्यनिर्धारण (Self Assessment) आकारणीची व्यवस्था करण्यांत येणार आहे, जेणेकरुन आकारणीमध्ये पारदर्शकता राहणार आणि स्वेच्छानिर्णय (डिस्क्रेशन) चा बाब राहणार नाही.

| | | |
|---|---|---|
| ३.२ | **जी.आय.एस. तंत्रज्ञानाव्दारे सर्व मिळकती 'कर आकारणी' च्या प्रभावाखाली आणणे** | महापालिका क्षेत्रातील सर्व मिळकतींवर मालमत्ता कराची आकारणी व्हावी, हे विचारात घेऊन महापालिका कार्यक्षेत्रात असलेल्या सर्व मिळकतींची जी.आय.एस. प्रणालीद्वारे माहिती तयार करण्यांत येतील व त्यांना विशिष्ट मालमत्ता क्रमांक देण्यांत येईल. सर्व मिळकती जी.आय.एस.नकाशावर दर्शविण्यांत येणार आहेत. अशा प्रकारे महापालिका क्षेत्रातील सर्व मिळकती मालमत्ता कराच्या प्रभावाखाली आणता येतील. |
| ३.३ | **इंधनावरील जकात कराचा दर कमी करुन मुंबई व जवळच्या परिसरात समकक्ष दर आणणे** | ठाणे महापालिका हद्दीमध्ये आयात होणा-या पेट्रोल-डिझेल व सी.एन.जी. या मालावर हद्दीलगतच्या इतर महापालिकेकडून आकारणेत येत असलेल्या जकात दरापेक्षा काही प्रमाणात जादा दराने जकात असल्यांचे दिसून येत आहे. ठाणे शहरातील नागरीकांना वाढत्या महागाईची झळ सोसावी लागू नये व इतर महापालिकांकडून आकारणेत येत असलेल्या सदर मालावरील जकातीच्या दरामध्ये समानता असावी, हा दृष्टीकोन विचारात घेऊन ठाणे महानगरपालिकेकडून प्रस्तुत वस्तुंवर आकारणेत येत असलेली जकात कमी करणेचे प्रस्तावित आहे. या संबंधित स्वतंत्र प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करणेत येईल. असे केल्यास जकात कर आकारणीतील Negative Externalities कमी होऊन जकात उत्पन्नात भर पडेल अशी अपेक्षा आहे. |

**३.४ जाहिरात**

जाहिरात विभागाचे मागील ३ वर्षाचे उत्पन्न अनुक्रमे रु. ३.३ कोटी, रु. ४.०९ कोटी आणि रु. ६.२७ कोटी आहे. यामध्ये बरीच सुधारणा करण्याची आवश्यकता आहे व ती सुधारणा करुन या बाबींवर कार्यवाही चालू आर्थिक वर्षात करण्याचा मनोदय आहे. नियमबाह्य जाहिरात करणा-यावर दंडात्मक कारवाई करुन उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येणार आहे.

**३.५ परवाना**

महापालिकेच्या नियमांच्या विहीत तरतुदीनुसार, दुकाने, कारखाने सर्व व्यवसाय यांना परवाने देताना महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी खाजगी संस्थेमार्फत सदर व्यवसायांचे सर्वेक्षणाच्या कार्यवाहीमध्ये गती आणून ठाणे महापालिका हद्दीतील व्यवसायिक आस्थापनांची माहिती संकलीत करुन घेण्यात येणार आहे. यामुळे महापालिका हद्दीतील व्यवसायांची **अद्ययावत** माहिती उपलब्ध होऊन परवाना फी वसुलीमध्ये वाढ अपेक्षीत आहे.

**३.६ राम गणेश गडकरी रंगायतन : एक लाभ केंद्र (Profit Centre)**

राम गणेश गडकरी रंगायतन हे ठाण्याचा मानबिंदू असून एका वर्षात ११०० नाटकाचे प्रयोग होण्याचा विक्रम येथे झालेला आहे. या नाट्यगृहात प्रायोजक नाटकाचे प्रयोग आयोजित करुन त्यातून नफा कमावतात. नाट्यगृह चालविण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी लागतो व भाड्यातून मिळणा-या उत्पन्नातून खर्च भागविला जात नाही. म्हणून रंगायतनमध्ये महापालिकेने नाटकाचे काही प्रयोग स्वतः प्रायोजित करुन आवश्यक निधी मिळविण्याचा मानस आहे.त्यापासून मिळणारे उत्पन्न "गडकरी रंगायतन सुधारणा निधी" मध्ये जमा करण्यात येईल. यामुळे रंगायतन चालविण्यासाठी होणारा खर्च रंगायतनाचे माध्यमातून अर्जित करुन रंगायतन हे "ना नफा ना तोटा" तत्वावर चालविण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे.

**३.८ पाणी चोरीवर नियंत्रण**

अनधिकृतपणे पाण्याची मोठ्या प्रमाणात चोरी होत असल्याने तसेच टँकरद्वारे पुरविण्यांत येणारे पाणी सध्या समकक्ष राखण्याची गरज आहे. पाणी चोरी थांबविण्यासाठी प्रत्यक्ष प्रत्येक घरोघरी जाऊन पाहणी व कागदपत्रांची छाननी करण्यात येणार आहे. अनधिकृत नळ संयोजने शोधुन ती नियमात बसत असल्यास नियमीत करुन देण्यात येणार आहे. तसेच अनधिकृत पाणी वापरावर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे.

**३.९ शहर विकास विभाग**

**बांधकाम परवानगी पारदर्शकता**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विकास परवानगी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याकरीता संगणकीकरण प्रणालीचा वापर करुन बांधकाम परवानगी देण्याबाबत प्रस्तावित आहे. बांधकाम परवानगीच्या प्रकरणांची माहिती उपलब्ध होणेसाठी व परवानगी विहित मुदतीत देणे सुलभ होणेसाठी, इंटरनेटवरुन माहिती उपलब्ध करुन स्वतंत्र संगणक प्रणाली कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यात बांधकाम परवानगी मुदतीत देण्यावर भर देण्यात येईल.

**विकास शुल्क**

शासन राजपत्र दि. २७/१२/२०१० नुसार विकास शुल्काचे दर शिघ्र शिध्दगणकाचे (रेडी रेकनर) चे दराने वसुल करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे विकास शुल्कामधून मिळणा-या उत्पन्नात वाढ होणार आहे.

## ४. सन २०११- १२ चे अर्थसंकल्पातील महत्वाचे प्रकल्प/योजना

### ४.१ शहर पर्यावरणामध्ये सुधारणा

**४.१.१ "हरित ठाणे प्रकल्प"**

नागरिकांना विरंगुळयासाठी व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शहरांत उद्यानांची नितांत आवश्यकता असते. ठाणे शहराच्या सध्याच्या लोकसंख्येचा विचार करता उद्यानांची

संख्या कमी आहे म्हणून ठाणे शहरात नव्याने उद्याने विकसित करणे, अस्तित्वातील उद्यानांची सुधारणा करण्यासाठी तसेच मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करुन 'हरित ठाणे प्रकल्प' राबविण्यांत येईल त्यासाठी रु.९.३० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आलेली आहे.

**४.१.२ 'हरित जनपथ' विकास प्रकल्प (पदपथ व सायकल ट्रॅक विकास)**

ठाणे शहरातून दररोज रोजगारासाठी/व्यवसायासाठी किमान ५ लक्ष नागरिक मुंबई येथे ये जा करतात. घरातून निघाल्यापासून बस थांब्यापर्यंत चालत जावे लागते. शहरात पदपथांची सद्यःस्थिती ही योग्य नसून नागरिकांना त्याचा पर्याप्त फायदा होत नाही. म्हणून "हरित जनपथ विकास प्रकल्प" राबविण्यांचा मानस आहे. या प्रकल्पांतर्गत पदपथांची रुंदी वाढविणे, चालण्यासाठी चांगला दर्जा निर्माण करणे, पदपथांलगत सायकल ट्रॅकची निर्मिती करणे इ. कामे करण्यांत येतील. त्यासाठी अर्थसंकल्पात रु.१० कोटीची तरतूद **प्रस्तावित** करण्यांत आली आहे. याचवर्षी "हरित जनपथ" चा एक नमुना तीन हात नाका येथे विकसीत करण्यात आलेला आहे. शहरात सर्व 'हरित जनपथ' एकमेकांशी जोडण्यात येतील व त्यांचे नेटवर्क सर्व उद्यानांशी स्थापित करण्याची योजना आहे.

**४.१.३ एकात्मिक तलाव सौंदर्यीकरण**

ठाणे शहर हे तलावांचे शहर म्हणून प्रसिद्ध असून अस्तित्वातील ३५ तलावांपैकी आतापर्यंत २४ तलावांचा विकास व संवर्धन करण्यांत आले आहे. यावर्षी तलावांचे शुध्दिकरण जैविक पध्दतीने सुरु करण्यात आलेले आहे. उर्वरित ११ तलावांचे काठावर अतिक्रमण होऊन तलाव नष्ट होऊ नये म्हणून सर्वांचा एकात्मिक विकास करण्याच्या दृष्टिने तलावाचे संवर्धन, जैविक पध्दतीने जलशुद्धीकरण व सौंदर्यीकरण करण्यासाठी अर्थसंकल्पीय वर्षात तलावांचे पुनरुजीवन व शुद्धीकरण या लेखाशीर्षांतर्गत रु. ५.४६ कोटी व तलाव सौंदर्यीकरण कार्यक्रमांतर्गत रु. ४.५० कोटी अशी

एकूण रु.९.९६ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे. तलाव सुशोभीकरणांतर्गत तेथे स्थापत्य कामे जास्त प्रमाणात करु नये अशा मताचा मी आहे. तलाव सुशोभीकरण करतांना उपलब्ध हिरवळ, माती धरुन ठेवणारे झाडे जे पर्यायाने जमिनीची हानी होऊ देणार नाहीत, जैविक माध्यमाद्वारे तलावाचे पाणी शुद्ध करणे, वनस्पती लावणे, वनस्पतींच्या माध्यमातून प्रदुषण नियंत्रण करणे, तलावाभोवतीचा परिसर नैसर्गिक उपायाने स्वच्छ ठेवणे या संकल्पना माझ्या मनात आहेत.

**४.१.४ शहरातील रस्ते धुळीकण मुक्त**

ठाणे शहरातील हवा सर्वेक्षणाच्या माहितीवरुन असे आढळून येते की, श्वसनशील धुळीकणांची मात्रा जास्त आहे. सदर धुळीकण हे वाहतुक इंधन ज्वलन, रस्तेवरील खोदकाम, बांधकाम, हॉटेल, बेकरी, उघडया जागेवरील इंधन ज्वलनाचा धूर यामध्ये रस्त्यावर त्याचा थर जमा होतो. श्वसनशील धुळीकणांचे मानक महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मान्यतेनुसार १०० मायक्रोग्रॅमपर क्युबीक मिटर आहे. परंतु ठाणे शहरात रस्त्यावरील मुख्य चौक, रहिवासी व्यापारी क्षेत्र स्टेशन परिसर येथे धुळीकणांचे प्रमाण मर्यादेपेक्षा कितीतरी जास्त आहे. सदर धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी रात्रीच्या वेळात मुख्य रस्ते नजीकचे विहिर /कुपनलिका पाणी वापरुन (जे पिण्यायोग्य नसेल) धुण्याची योजना आखलेली आहे. जेणेकरुन वातावरणातील धुळीचे प्रमाण कमी होईल. हया प्रयोजनासाठी रु.२५ लाखांची तरतूद करण्यात येत आहे. यासोबत सर्व कंत्राटदार व विकासकांना वातावरणात धुळिकण कमी करण्यासाठी कडक दिशानिर्देश देण्यांत येतील व दंड आकारण्याबाबत कारवाई करण्यांत येईल.

**४.१.५ वृक्षप्राधिकरण**

**वृक्षारोपण करणे**

महापालिकेच्या नव्याने विकसीत करण्यात येत असलेल्या रस्त्यांच्या दुतर्फा तसेच सुविधा भूखंड, उद्यान आरक्षित भूखंड, अशा अंदाजे एकूण २०० एकर क्षेत्रफळाच्या जागेवर किमान पाच वर्ष वयाच्या वृक्षांचे रोपण करण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे. या वृक्षारोपणामध्ये स्थानिक प्रजाती जसे सप्तपर्णी, बहावा, कैलासपती, महोगनी, ताम्हण, आंबा, नारळ, जांभूळ, कदंब, वड, पिंपळ यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात येणार आहे. यासाठी अर्थसंकल्पात रु. २.७५ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**खारफुटीची लागवड**

वाघबिळ, बाळकुम, कळवा, मुंब्रा, या लगत असलेल्या खाडीकिनारी किमान दहा हजार स्थानिक तिवरांची लागवड करुन किमान १८ महिने निगा, देखभाल करण्याचा चौथ्या टप्प्यातील प्रकल्प नियोजीत आहे. यासाठी रु.१५ लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**रोपवाटीका विकास**

कासारवडवली येथील रोपवाटीकेमध्ये किमान ५ वर्षे वयाची व अंदाजे ५ फुट उंचीची ५००० स्थानिक प्रजातीच्या वृक्षांची रोपे खरेदी करुन वृक्षारोपणासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. यासाठी रु.२५ लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**वृक्ष गणना व संवर्धन**

ठाणे महापालिकेच्या हद्दीत अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन जीपीएस व जीआयएस पध्दतीने वृक्षांची गणना करण्याचे काम ९० टक्के पूर्ण करण्यात आले आहे. यामध्ये वृक्षांची स्थळदर्शकता निश्चित होणार असुन, त्यामुळे अनधिकृत वृक्षतोड निदर्शनास येऊ शकेल, यासाठी रु.४० लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे. विकास कामांमुळे होणारी वृक्षतोड थांबवून व नविन तंत्रज्ञान वापरून यापुढे जास्तीत

जास्त वृक्षांना पुनर्स्थापन करण्यावर भर देण्यात येईल. यासाठी सर्व विकासकांना मिळून एक नविन यंत्र खरेदीकरण्यासाठी त्यांना प्रवृत्त करण्यात येणार आहे. ज्याचा वापर सर्व विकासक करु शकतील.

**४.२ घनकचरा व्यवस्थापन**

ठाणे महानगरपालिकेकडून शहर स्वच्छतेचा आराखडा तयार करण्यात येत आहे. परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या उद्देशाने "ठाणे महानगरपालिका स्वच्छता आणि आरोग्य उपविधी" सुध्द् तयार करण्यात येत आहे.

**४.२.१ घरोघरी कचरा संकलन (घंटागाडी योजना)**

नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० ची अंमलबजावणी करणेकरीता ९ प्रभाग समिती क्षेत्रामध्ये निर्माण होणारा कचरा घरोघरी जाऊन संकलन व वाहतुक करणेकरीता ८० मोठया बंद स्वरुपातील हायड्रोलिक पध्दतीच्या घंटागाड्या, १३ छोटया चार चाकी हायड्रोलीक पध्दतीच्या घंटागाड्या, ४४ तीन चाकी घंटागाड्या भाडे तत्वावर घेण्यात आल्या आहेत. त्याकरीता अर्थसंकल्पात रु.८ कोटीची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**४.२.२ घरोघरी कचरा संकलन (कचरा वेचकांचा सहभाग)**

ठाणे शहरातील झोपडपट्टया व डोंगर उतारावरील वस्त्यांमध्ये ज्याठिकाणी घंटागाड्या पोहोचु शकत नाहीत अशा ठिकाणी ३५० कचरा वेचकांची नियुक्ती करण्यात आली असुन, प्रत्येक कचरा वेचकाला महापालिकेकडून रु.१००० प्रति महा मानधन देण्यात येत असून लाभार्थी कडून १० रुपये प्रति लाभार्थी प्रती महिना हिस्सा अपेक्षित आहे. त्यांचेमार्फत अशा वस्त्यांतील घनकच-याचे १०० टक्के संकलन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यासाठी रक्कम रु. ६० लक्षची तरतुद अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आली आहे. या योजनेमुळे उघडयावर, नाल्यांमध्ये कचरा साठविण्याचे प्रमाण कमी होईल अशी अपेक्षा आहे.

**४.२.३ सार्वजनिक रस्ते सफाई**

ठाणे महानगरपालिका हद्दीतील दैनंदिन साफसफाई अधिक प्रभावी होण्यासाठी सुमारे १५२ कि.मी.मोठया रस्त्यांची साफसफाई खाजगी ठेकेदारामार्फत एकूण १९ गटांमध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.या वर्षी काही निवडक मुख्य रस्ते चोवीस तास स्वच्छ ठेवण्यावर भर देण्यात येतील व त्यासाठी मुख्य रस्त्यांना "No Tolerance Road" घोषीत करण्यात येईल. सार्वजनिक रस्ते साफसफाईकरीता अर्थसंकल्पात रु.११.२५ कोटी इतकी रक्कम प्रस्तावित आहे.

**४.२.४ रिफ्युज कॉम्पॅक्टरद्वारे कचरा संकलन :**

रस्त्यावरील साफसफाईतुन निर्माण होणारा घनकचरा व गृहसंकुलामध्ये निर्माण होणारा कचरा एका ठिकाणी गोळा करुन तो मनुष्यबळाद्वारे, डपंरद्वारे दुबार हाताळणी केली जाते. या बाबीवर उपाय म्हणून, रस्ते साफसफाई ठेकेदारांकडील डंपर कमी करुन प्रत्येक प्रभाग समितीनिहाय ६ क्युबिक मिटर चे ९ कॉम्पक्टर आणि १२ क्युबिक मिटरचे ९ कॉम्पक्टर असे एकूण १८ कॉम्पक्टर ३ शिफ्टमध्ये कार्यान्वित करणेबाबत प्रस्तावित आहे.

**४.२.५ रिफ्युज बीन खरेदी**

शहरामध्ये घंटागाडयासारखा उपक्रम राबविण्यात येऊन देखिल वेळोवेळी कचरा रस्त्यावर पडण्याचे प्रकार दिसुन येतात. बऱ्याचशा गृह निर्माण संस्थेमध्ये आवश्यक कच-याचे बिन्स दिसुन येत नाहीत. दोन/तीन गृहनिर्माण संस्थामध्ये एक अटेंडंट एकाच बिन्सचा वापर करीत असल्यामुळे घंटागाडीचा वापर न करतां रस्त्यावर कचरा टाकण्यात येतो. नगरसेवक निधीतुन गृहनिर्माण संस्थांना तसेच व्यवसाय धारकांना विशेष बाब म्हणून बिन्स महानगरपालिकेकडून पुरवठा केल्यास शहरामध्ये घरोघरी कचरा संकलनाचे काम परिणामकारकरित्या होण्यास मदत होणार आहे. रिफ्युज बीन खरेदीसाठी अर्थसंकल्पात रु.२.२५ कोटीची तरतूद करण्यात आलेली

आहे.

**४.२.६ बायोमिथेनायझेशन प्रकल्प** घनकचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरीता बायोमिथेन गॅस निर्मीतीसाठी शिवाजी महाराज रुगणालय परिसरात १५ टन क्षमतेचा प्रकल्प आणि हिरानंदानी इस्टेट, पातलीपाडा येथे ५ टन क्षमतेचा प्रकल्प खाजगी सहभागाने सुरु करण्यात आले आहेत. या पासून ४५० युनिट प्रति दिवस वीज निर्माण होत आहे.तसेच कोपरी तेथील मलनि:रण प्रक्रीया प्रकल्प व बाळकूम येथील सुविधा भूखंड या दोन ठीकाणी बायोमिथेनायझेशन प्रकल्प प्रस्तावीत आहेत. यासाठी तरतूद रु.२५ लक्ष प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**४.२.७ घनकचरा प्रक्रिया प्रकल्प सुरु करणे** ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील डायघर येथील नियोजीत घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी बी.ओ.टी तत्वावर करारनामा करण्यात आला होता. तथापि, स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे सदरचा प्रकल्प उभा राहू शकला नाही. त्यामुळे याबाबत मा. अध्यक्ष विधानसभा यांचे अध्यक्षतेखाली हिवाळी अधिवेशनाचे वेळी नागपूर येथे दि.१६/१२/२०१० रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रक्रिया प्रकल्प उभारण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने वेस्ट टु एनर्जी आधारीत प्रक्रिया प्रकल्प उभारण्याच्या अनुषंगाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वारस्याची अभिव्यक्ती (E.O.I) मागवून पुढील कार्यवाही हया वर्षात प्रस्तावित आहे.

## ५ नागरी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण

**५.१.१ पाणी पुरवठा वितरण व्यवस्था** ठाणे महानगरपालिकेने हाती घेतलेल्या वितरण व्यवस्थेतील टप्पा क्र. १ व टप्पा क्र. २ या योजना बहुतांशी पुर्ण झाल्या असून, सदर योजना सन २०११ च्या लोकसंख्येसाठी संकल्पीत करण्यांत आल्या होत्या. भविष्यातील लोकसंख्येसाठी आताच नियोजन करणे आवश्यक असल्याने

ठाणे शहराच्या वाढत्या भागांचा व पर्यायाने येणा-या भविष्यातील लोकसंख्येचा विचार करुन वितरण व्यवस्था प्रकल्प हाती घेणे आवश्यक आहे. याबाबत नियोजन करुन घोडबंदर रोड, वागळे इस्टेट, मुंब्रा, दिवा व कळवा या भागासाठी भविष्यातील पाणी पुरवठ्यासाठी वहन व्यवस्था, संप व पंप हाऊस, पाण्याच्या टाक्या, अतिरिक्त वितरण व्यवस्था, पंपिंग मशिनरी बसविणे ही कामे टप्याटप्याने हाती घ्यावयाची आहेत. यासाठी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पात रु.२२.५० कोटींची तरतूद करण्यांत आलेली आहे.

**५.१.२ पाण्याच्या ठोक संयोजनांवर जलमापके बसविणे (बल्क वॉटर मीटरींग)**

नागरीकांना पुरवठा करण्यात येणा-या पाण्याचे योग्य नियोजन व नागरीकांकडून पाण्याच्या बिलाची वसुली होण्याच्या दृष्टीकोनातून ठाणे महानगरपालिकेने नागरीकांच्या १" व्यासावरील ठोक संयोजनावर एमआरए पध्दतीची जलमापके बसविण्याच्या निविदा मागविल्या आहे. प्रथम टप्यात 'बल्क' संयोजनावर जलमापके बसविल्याने सुमारे ३०% ते ३५% एवढे पाणी परिमाण योजना येईल व पाणी वितरणात सुसूत्रता आणता येईल. प्रथम टप्प्यात ४०४५ एवढी जलमापके बसविण्यांत येतील. यासाठी सन २०११- १२ च्या अर्थसंकल्पात रु. ३.५० कोटींची तरतूद करण्यांत आली आहे.

**५.१.३ विहिरी साफसफाई/ पुनररुजीवन**

ठाणे महापालिका हद्दित एकूण ५५५ विहिरी आहेत, या पैकी सन २०१०-११ या आर्थिक वर्षात १२३ विहिरींची साफसफाई व दुरुस्ती करण्यात आली आहे. सन २०११- १२ या आर्थिक वर्षात सुमारे १५० विहिरींची साफसफाई व दुरुस्ती करण्याचा मानस आहे. या लेखाशिर्षकाअंतर्गत रु. ७५ लक्ष एवढी तरतूद प्रस्तावित आहे.

**५.१.४ वर्षा जल संचयन**

ठाणे महापालिकेच्या स्वतःचे मालकीच्या इमारतींवर वर्षा जल संचयन प्रकल्प राबविण्यात येत असून २ अग्निशमन केंद्र, ४ प्रभाग समिती इमारती व ८ शाळा अशी कामे हयाच वर्षी पुर्ण होणार आहेत. वर्ष २०११-१२ मध्ये आणखी १६ इमारतींवर वर्षा जल संचयन प्रकल्प राबविण्यात येणार असून यासाठी रु. १ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

## ५.२ रस्ते, पूल आणि वाहतूक प्रचालन

**५.२.१ "श्रीस्थानक लोकमार्ग प्रकल्प"** **(बी.आर.टी.एस., ठाणे)**

वाढत्या शहरीकरणामुळे वाढलेली लोकसंख्या त्या अनुषंगाने वाढलेल्या वाहनांची संख्या व मर्यादीत रुंदीचे रस्ते यामुळे वाहतुकीवर प्रचंड ताण आहे. वाहतुक कोंडीमुळे सामान्य नागरिकांना इच्छित स्थळी पोहचण्यासाठी जास्त वेळ लागतो व तसेच प्रदुषणात वाढ ही होते. या बाबींचा विचार करता प्रमुख भागात शीघ्रगतीने वाहतूक होणेसाठी शहरात "बस द्रूतगती वाहतुक व्यवस्था" कार्यान्वीत करण्यांचा मानस असून त्यासाठी अर्थसंकल्पात रु.६.९० कोटी निधीची तरतूद करण्यांत आलेली आहे.

**५.२.२ विकास आराखडयातील रस्ते**

ठाणे महानगरपालिका हद्दितील घोडबंदर परिसर, कळवा, खारेगांव, कौसा, शिळ परीसर या भागाचा मोठया प्रमाणात विकास होत आहे. विकास योजनेअंतर्गत महत्वाचे रस्ते हाती घेण्यात आले असून, सन २०१०-११ या आर्थिक वर्षात कळवा, दिवा, शिळ, घोडबंदर परीसरात प्रामुख्याने ६ रस्ते विकसित करण्यासाठी व नविन रस्त्यांपैकी ४ रस्त्यांचे बांधकाम पुर्ण होणार असून, उर्वरीत रस्त्यांची कामे सन २०११- १२ या आर्थिक वर्षात पुर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या कामासाठी रक्कम रु. १५ कोटीची तरतूद प्रस्तावित आहे.

**५.२.३ रस्ता रुंदीकरण/ नुतनीकरण**

या लेखाशिर्षकांतर्गत अस्तित्वातील रस्त्यांचे रुदीकरण/नुतनीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार सन २०११-१२ या वर्षात एकूण ९ (९.९० कि.मी) मुख्य रस्त्यांची कामे सुरु / हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी पुढील वर्षात उरलेल्या ३.२५ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे बांधकाम पुर्ण होण्याचे उद्दिष्ट आहे.

तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील एकुण ३५.२० कि.मी. लांबीच्या पुनःपृष्टीकरण व एकूण २० चौकांचे मास्टिक अस्फाल्ट करण्याचे काम प्रामुख्याने हाती आले असून, सदरचे काम टप्प्याटप्प्याने या आर्थिक वर्षात आणि पुढील आर्थिक वर्षात मे २०११ अखेर पुर्ण करण्याचा मानस आहे.

या व्यतिरीक्त एकूण मुख्य २० रस्ते वसाहतीत रस्तेसह १९.०० कि.मी. लांबीचे रस्त्यांचे डांबरीकरण (सेमी रिजीड पेव्हमेंट / मास्टिक अस्फाल्ट ) करण्याचे मानस आहे. तसेच या वसाहतीत काही वस्त्यादेखील या रस्त्यांचा वापर करीत आहेत. त्यासाठी सुमारे ४.५ कि.मी.लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरणाद्वारे नुतनीकरण करण्याचा मानस आहे. तरतूद रु. १७.५० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**५.२.४ रस्ते सिमेंट कॉंक्रीटीकरण**

या लेखाशिर्षकाअंतर्गत अस्तित्वातील रस्त्यांवरील देखभाल व दुरुस्तीचे खर्च कमी करण्याच्या अनुषंगाने दरवर्षी सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांची कामे हाती घेण्यात येतात. त्यापैकी मार्च २०१० अखरे ५९.६९ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे कॉन्क्रीटीकरण करण्यात आले आहे. उर्वरीत २.४० कि.मी. लांबीचे काम सन २०११- १२ या आर्थिक वर्षामध्ये जुन २०११ अखेर पुर्ण करुन वाहतुकीसाठी खुले करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेला आहे. यासाठी रु. २१ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

| | | |
|---|---|---|
| ५.२.५ | **यु.टी.डब्ल्यु.टी. तंत्रज्ञान वापरुन रस्ते विकास** | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांचे यु.टी.डब्ल्यु.टी. या आधुनिक तंत्रज्ञानाने रस्ते विकासाचे प्रकल्प सन २००९-१० पासून हाती घेण्यांत आले असून सदर आधुनिक पध्दतीने आता १०७७ मीटर पर्यंत लांबीच्या रस्त्यांचे कॉन्क्रीटीकरण यशस्वीरीत्या पुर्ण करण्यात आले असून सन २०१०-११ मध्ये एकूण ४८ रस्ते (२५.४२ कि. मीटर) रस्ते हाती घेण्यात आले आहे. सदर रस्त्यांपैकी १.७० किमी लांबीचे रस्त्यांचे काम मार्च २०११ अखेर पुर्ण होणार असुन उर्वरीत २३.७२ लांबीचे रस्त्याचे काम सन २०११-१२ या आर्थिक वर्षात पुर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी रु. ५४ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे. |
| ५.२.६ | **मिसिंग लिंक्स् जोडणे** | ठाणे महानगरपालिका हद्दितील घोडबंदर परिसर खारेगाव, कौसा, शिळ परिसरात मोठया प्रमाणावर निवासी व वाणिज्य संकुले विकसित होत आहे. यासाठी वाहतुकीची कोंडी कमी करण्यास रस्त्यांचे मिसिंग लिंक्स् जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे मुख्य मार्गावरील वाहतुक ब-याच प्रमाणावर कमी करता येईल. तसेच विस्तारीत भागातील रहिवाशांना त्याचा वापर करता येऊ शकेल. या करीता प्रशासनाने मंजूर विकास योजनेतील विकसित झालेल्या रस्त्यांना जोडणारी विकास योजनेतील अविकसित रस्त्यांची म्हणजे मिसिंग लिंक्स विकसित करणे चे प्रस्ताव हाती घेण्यात आले आहेत. यासाठी रु.८ कोटी तरतूद करण्यांत आली आहे. |

**५.२.७ घोडबंदर सेवा रस्ता**

ठाणे शहरातील विकास योजना मध्ये ६० मी रुंदीचा घोडबंदर रस्ता दर्शविण्यात आलेला आहे. एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पामध्ये ४२ मी. रुंद रस्ता विकसित करण्यात आलेला आहे. घोडबंदर रोड परिसरात दुतर्फा निवासी व वाणिज्य संकुल विकसित होत आहेत. या परिसरातील अंतर्गत वाहतुकीकरीता वाहनांना घोडबंदर रोड या रस्त्यावंर प्रवास करावा लागतो. पर्यायाने या रस्त्यांवर वाहतुक वर्दळ, कोंडी व अपघातांच्या घटनेमध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे घोडबंदर रस्यांच्या दुतर्फा ९ मीटर रुदीचे सेवा रस्ते विकसित करणे जरुरीचे असल्याने सन २०१०-११ या आर्थिक वर्षात प्रथम टप्प्यात उजव्या व डाव्या बाजूकडील सेवा रस्त्यांसह एकूण लांबी ४.२० कि.मी. विकसित करण्याचे काम हाती घेण्यात आले असून, सदर रस्त्यांचे बांधकाम सन २०११-१२ या आर्थिक वर्षात पुर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

या लेखाशिर्षाखाली रु.१४ कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**५.२.८ पुलांचे रुंदीकरण व विकास**

सदर लेखाशिर्षकाअंतर्गत वागळे इस्टेट मेनरोड, बी.एम.सी. पाईप लाईन वरील पुलाचे बांधकाम प्रस्तावित करण्यात येत आहे. यासाठी रु.७० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**कळवा खाडीवर पुल**

ठाणे आणि कळवा या दरम्यान खाडीवर असणारा ब्रिटिशकालीन जुना कळवा पुल त्याचे आयुर्मान संपल्यामुळे कमकुवत झालेला आहे. सध्या हा पूल वाहतुकीस बंद करण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी नविन कळवा पुलावर प्रचंड प्रमाणात वाहतुकीचा ताण पडत आहे. सदर विभागामधील असलेली प्रचंड

वाहतुक पाहता नविन कळवा पुला शेजारी असलेला जुना कळवा पुलाचे जागेवर नविन पुल बांधण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. प्रकरणी मोठया प्रमाणात खर्च येणार असून शासनाचे माध्यमातून निधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न या कामी करण्यात येणार आहे. तसेच सदर पुल हा पुरातत्व वस्तु असल्याने त्याचे जागेवर नविन पुल बांधणेसाठी प्रथमतः याबाबत नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. हया कामासाठी रु.१० कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**५.२.९ उड्डाण पुलाचे निर्माण**

ठाणे शहरातील लाल बहाद्दूर शास्त्री मार्ग हा मूळचा राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ असून चेंबूर ते गोल्डन डाईज जंक्शन असा पुर्वद्रूतगती महामार्ग यापुर्वीच बांधण्यात आला आहे. लाल बहाद्दूर शास्त्री मार्ग तसेच महात्मा गांधी पथ दाट लोकवस्तीच्या भागातून जात असल्याने या रस्त्यावरील वाहतूक वर्दळ मोठया प्रमाणावर आहे. लाल बहाद्दूर शास्त्री मार्गावर हरीनिवास चौक, तीन पेट्रोल पंप, अल्मेडा चौक, खोपट चौक मीनाताई ठाकरे चौक, महात्मा गांधी पथावर संत नामदेव चौक, (टेलिफोन एक्सचेंज) असे अत्यंत मोठया प्रमाणातील वाहतुक वर्दळीचे चौक आहेत. याप्रमाणे एकूण दोन उड्डाणपुल बांधण्याचे प्रस्तावित असून त्यांचा एकूण अंदाजखर्च रु.२५६.२३ कोटी एवढा अपेक्षित आहे. याबाबतचा निधी एमएमआरडीएकडून प्राप्त होणार आहे. यासाठी वर्ष २०११-१२ मध्ये रु.१२५ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**५.२.१० कोपरी आर.ओ.बी.**

खूप रखडलेला कोपरी ROB प्रकल्प हयावर्षी पूर्ण करण्यात येईल. रेल्वेने सुचविल्यानुसार वाहनांसाठी बाधावयाच्या पुलाचे सुधारीत आराखडयानुसार बांधकामासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. यासाठी रु. ३.६० कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**५.२.११ विटावा आर.यु.बी.**

विटावा आर.यु.बी. च्या कामी रेल्वे विभागाने सुचित केल्यानुसार आराखडे सुधारीत करण्यात आले असून सुधारीत आराखडयानुसार रेल्वे विभागाची मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार सदर कामी निविदा मागवून ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली असनू, सर्व आर.सी.सी. ब्लॉक्स तयार झाले असून पुशिंगची योजनेलासुध्दा मध्य रेल्वेची मान्यता मिळालेली आहे. सदर प्रत्यक्ष पुशिंगचे काम सुरु करण्याची अंतीम परवानगी रेल्वेचे सबंधित खात्याकडून प्राप्त झाल्यावर काम सुरु करता येईल. या पुशिंगच्या कामास तीन महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. यासाठी रु. ५.९६ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे. सदर काम वर्ष २०११-१२ मध्ये अवश्य पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

**५.२.१४ ठाणे शहरात पार्किंग सुविधा बांधणे**

वाहनांच्या वाढत्या संख्येकडे पहाता त्या संबंधी पार्किंग व इतर यंत्रणेची सुधारणा आवश्यक आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व्हिस रस्ता, साकेत रस्ता, बाळकुम रस्ता येथे दुतर्फा होणा-या अवजड वाहनांच्या अवैध पार्किंगमुळे शहरातील वाहतूकीवर विपरित परिणाम झाला असून त्यामुळे मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे. त्याकरीता महापालिकेमार्फत ट्रक टर्मिनस व समुचित ठिकाणी वाहन तळांचा विकास करण्याचा महापालिकेचा मानस आहे. यासाठी रु.५ कोटीची तरतूद प्रस्तावित आहे.

**५.३ सामाजिक पायाभूत सुविधा**

| | | |
|---|---|---|
| **५.३.१** | **प्रभाग कार्यालय बांधणे** | सन २०१०-११ या आर्थिक वर्षात कळवा येथील प्रभाग कार्यालयाची नविन इमारतीचे बाधंकाम हाती घेण्यात आले असून पहिला टप्पा अंतर्गत रू.१.२३ कोटीचे काम सन २०११-१२ मध्ये आणि दुसऱ्या टप्प्या अंतर्गत रू.८५.०० लक्ष चे काम सन २०१२-१३ मध्ये पुर्ण करण्याचे तसेच मुंब्रा येथील नविन प्रभाग कार्यालय इमारतीचे बांधकाम बी.ओ.टी. तत्वावर करण्याचे उद्दिष्ट आहे. |
| **५.३.२** | **मंडई बांधणे** | महापालिकेच्या मंडई विकासासाठी रू.१० कोटी एवढी तरतूद प्रस्तावित आहे.<br>अ) सदर तरतुदीमधून गांवदेवी मार्केटच्या इमारतीचे उर्वरीत काम करणेचे हाती घेण्यात येतील. या इमारतीत तळघरात २५० दुचाकी वाहनाकरीता वाहनतळ उभारण्यात येणार आहे. त्यामुळे पार्कींगची व्यवस्था होईल व अस्तित्वातील १५४ भाजी विक्रेत्यांचे पुनर्वसन करण्याचे प्रयोजन सफल होईल.<br>ब) तसेच छत्रपती शिवाजी महाराज मैदानालगत असलेले जिजामाता मार्केट व शिवाजी मार्केट, मैदान व गांधी उद्यानाची जागा या परिसराचे सर्व समावेशक संकल्पन तयार करून त्यामध्ये मार्केट तळमजल्यावर तयार करणे व त्यावर मैदान आणि उद्यानाचे नवीन आराखडे तयार करून हा एकात्मिक विकासाचा प्रकल्पदेखील राबविण्याचा महापालिकेचा संकल्प आहे. |

| | | |
|---|---|---|
| ५.३.३ | **दादोजी कोंडदेव स्टेडियम/ नुतनीकरण** | दादोजी कोंडदेव स्टेडीयम/खंडू रांगणेकरण बॅटमिंटन हॉल नुतनीकरण देखभाल या करीता सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरीता रक्कम रू.१ कोटी तरतुद ठेवण्यात आली असून, या तरतुदी अंतर्गत स्टेडीयम मध्ये येणारे खेळाडूंचे मनोधेर्य वाढविण्याकरीता व विविध खेळाचे प्रकारात अधिकाधिक उत्तमोत्तम खेळाडू तयार होणे दृष्टिकोनातुन बॅटमिंटन हॉल, स्कॉश कोर्ट, लाँन टेनिस, टेबल टेनिस हॉलचे नुतनीकरण करणे, स्टेडीयमचे संपुर्ण ड्रेनेज सिस्टम, पार्कींग तसेच व्यायामशाळा व क्लब हाऊस चालविणेचे दृष्टीकोनातुन त्याचे नुतनीकरण करणे. स्टेडीयमचे मैदानाची व छताची सुधारण करणे व स्वच्छतागृहाचे नुतनीकरण करणे. तसेच सुरक्षा रक्षकांकरीता केबीन तयार करणे इ.कामे हाती घेण्यात येणार आहेत. भविष्यकाळात हया क्रिडासंकुलाचा विकास BOOT मार्गातून करण्याचा मानस आहे. |
| ५.३.४ | **उन्नती गार्डन मिनी स्टेडियम बांधणे** | उन्नती गार्डन येथील स्टेडियम अंतर्गत प्रेक्षक गॅलरी, खेळाचे मैदान, क्लॉक टॉवर व सभोवती जॉगींग ट्रॅक, गाड्या पार्किंगची व्यवस्था, इनडोअर गेम खेळाची व्यवस्था करण्यात येणार असून सदर बांधकामासाठी वास्तु विशारद नेमणुक करण्याची प्रक्रिया सुरु असून, सदर स्टेडियमचे बांधकाम सन २०११-१२ व सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात टप्प्याटप्प्याने पुर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी २०११-१२ या आर्थिक वर्षात रु.१.५० कोटी तरतुद करण्यात आली आहे. |
| ५.३.५ | **कौसा क्रीडा संकुल** | यामध्ये शाळा, स्टेडीयम, हॉस्पीटल व मनोरंजनाची जागा यांचा समावेश आहे. या ताब्यात घेण्यात |

आलेल्या स्टेडियमसाठी आरक्षित/मनोरंजनाची जागा क्र.५ अशा एकत्रित ६६,००० चौ.मी. जागेवर सी.आर.झेड. व्यतीरिक्त ताब्यात असलेल्या जागेवर अद्ययावत क्रीडा संकुल टप्या टप्याने विकसीत करण्याच्या महानगरपालिकेचा प्रस्ताव आहे. हयाबाबत एजन्सी निश्चित झाली असून सन २०१०-११ या आर्थिक वर्षात रु.३.०० कोटी खर्च अपेक्षित असून, सन २०११-१२ मध्ये रु.५ कोटीची तरतूद ठेवण्यात आली आहे.

५.३.६ **दवाखाना बांधणे**

उथळसर, वागळे, मानपाडा व मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत नागरिकांना आरोग्य विषयक सुविधा तात्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून सन २०११-१२ या आर्थिक वर्षात नुतनीकरण व नविन बांधकाम करण्याचे काम प्रस्तावित आहे. यासाठी रु. ३.४५ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

५.३.७ **कत्तलखाना बांधणे**

उथळसर प्रभाग समिती अंतर्गत राबोडी येथे अद्ययावत कत्तलखाना बांधकाम करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने याच वर्षात ई.टी.पी बांधणे, जनावरांसाठी शेड बांधणे, जनावरांची कत्तल करण्याकरिता आधुनिक मशिनरी पुरविणे, इमारतीचे विद्युतीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत नियोजनाची कारवाई सुरु असून सदरचे काम सन २०११-१२ मध्ये पुर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत कत्तलखाना BOOT मार्गाने विकास करण्याची योजना आहे. या लेखाशिर्षांतर्गत सदर आर्थिक वर्षात रु.१ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| ५.३.८ | **शाळा बांधणे व सर्व शिक्षा अभियांनातर्गत शाळा बांधकाम** | महापालिका हद्दितील मुलांना अद्ययावत शिक्षण विषयक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीकोनातुन महापालिकेने विविध ठिकाणी शाळा बांधण्याचे कामे हाती घेतली आहेत. या लेखाशिर्षकाअंतर्गत या आर्थिक वर्षात दोन्ही मिळून रु.१० कोटी तरतुद करण्यात आली आहे. |
| ५.३.९ | **जकात नाके सुधारणा** | ठाणे महानगरपालिकेचे जकात हे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे. जकात भरण्यासाठी येणाऱ्या व जकात भरून जाणाऱ्या वाहनांची वाहतुक सुरळीत व सुरक्षित होण्याच्या दृष्टीकोनातुन महापालिकेच्या विविध ठिकाणी असणाऱ्या जकात नाक्यांमधील यार्डचे नुतनीकरण करणे, सुधारणा करणे व या जकात नाक्यांवर काम करणाऱ्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना अद्ययावत सुविधा देण्याचा समावेश आहे. या लेखाशिर्षकाअंतर्गत या आर्थिक वर्षात रू.६० लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. |
| ५.३.१० | **स्मशानभुमी/कब्रस्तान नुतनीकरण** | सन २०१०-११ या आर्थिक वर्षात ठाणे शहराच्या नव्याने विकसीत होणाऱ्या माजिवडा मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या कोलशेत गावामध्ये दोन स्मशानभुमीचे नुतनीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले असून, माजिवडा गावातील स्मशानभुमीवरील पारंपारिक लाकडाचा वापर कमी करुन पर्यावरणभिमूख सि.एन.जी./एल.पी.जी.मध्ये रुपांतर करण्याचे प्रस्तावित आहे.<br>सन २०११-१२ या आर्थिक वर्षात विटावा येथील स्मशानभूमीचे नुतनीकरण करण्याचे प्रस्तावित आहे.<br>या लेखाशिर्षकांतर्गत सन २०११-१२ च्या |

अर्थसंकल्पात रुपये २.५० कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील विभागणीय असलेल्या अत्यंत महत्त्वाच्या स्मशानभूमी–जवाहर बाग, वागळे इस्टेट, मुंब्रा, कळवा, मानपाडा इ. ठिकाणी असलेल्या स्मशानभूमींचे नवीन संकल्पन करून त्यानुसार आराखडे मंजूर करणे, अंदाजखर्च तयार करून अशा स्वरुपाचा एकात्मिक स्मशानभूमी व दफनभूमी कार्यक्रम राबविण्याच्या उद्देशाने याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यास मा.राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करून घेणेबाबतची कार्यवाही प्राधान्याने करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| ५.३.११ | **राजीव आवास योजना (निवारा निधी)** | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे २१० झोपडपट्टी वस्त्यांमधून वास्तव्य करणाऱ्या सुमारे ६–७ लाख नागरी गरीबांचे जीवनमान उंचावण्यासाठी या झोपडपट्ट्यांचा विविध माध्यमातून पुनर्विकास होणे आवश्यक आहे.<br>या योजनेसाठी केंद्र शासनामार्फत देशातील २४ शहरांमधून ठाणे शहराची झोपडपट्टीमुक्त शहराकरीता निवड झाली असून त्यानुसार आपणास प्राधान्याने संबंधित झोपडपट्यांचे अंतर्गत केलेले सोशिओ-इकॉनॉमिक व बायोमॅट्रिक सर्व्हेक्षणाचे संकलन करून त्यानुसार प्राधान्यक्रम ठरवून टप्पेनिहाय सदर योजना कशाप्रकारे राबविता येईल, यासाठी सविस्तर नियोजन करण्याचा मानस असून त्याकरीता शासनामार्फत अनुदान प्राप्त होणार आहे. यासाठी रु. २ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे. |
| ५.३.१२ | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजना** | माजिवडा आणि भाईंदरपाडा दोन्ही ठिकाणच्या भूखंडावर आवश्यक ते नकाशे, आराखडे व अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्याद्वारे माजिवडा येथे १०८ सदनिका व भाईंदरपाडा येथे २४० सदनिका याप्रमाणे एकूण ३४८ सदनिका प्राप्त होणार आहेत. यासाठी रक्कम रु.२३.५ कोटी एवढा खर्च अपेक्षित असून राज्य शासनाकडे निधी उपलब्धतेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल पाठवून प्रयत्न करण्यात येतील. सन २०११-१२ मध्ये यासाठी रु. ४ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे. |
| ५.३.१३ | **स्थावर मालमत्ता विभाग : ॲसेट इनव्हेंटरी** | ठाणे महापालिकेच्या भूखंड, विकास कामातुन निर्माण झालेल्या अशा सर्व प्रकारच्या मालमत्तांचे नोंद रजिस्टर करण्यासाठी, महापालिकेच्या अस्तित्वात असलेल्या सर्व मालमत्तांचा सर्व्हे करुन मिळकतींबाबतचे रेकॉर्ड |

**अद्ययावत** करण्यात येणार आहे. भांडवली खर्चातुन निर्माण झालेल्या सर्व मालमत्तांच्या नोंदी **अद्ययावत** करण्यात येणार असुन यासाठी रु.२५ लक्षची तरतुद करण्यात आली आहे. याबाबत निविदा मागवुन अनुभवी संस्थांकडून सदरची कार्यवाही करण्यात येणार आहे.

**६. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी कार्यक्रम**

**६.१ पावसाळी पाण्याचा निचरा (एकात्मिक नाले विकास प्रकल्प)**

केंद्र/राज्य शासनाच्या मदतीने जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियानाअंतर्गत टप्पा क्र.१, २ व ३ अंतर्गत महापालिका क्षेत्रात नाले बांधण्याचे काम एकात्मिक नाले विकास प्रकल्पाअंतर्गत करून घेण्यात आले असून सदर कामे ३१ मार्च २०११ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

मुंब्रा विभागातील उर्वरित नाले बांधकाम करण्यासाठी अर्थसंकल्पात रू.१३.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली. सन २०११-१२ मध्ये वरील कामे पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

**६.२ विज निर्मिती व विजेची बचत**

**६.२.१ सौर शहर विकास प्रकल्प**

केंद्रशासनाच्या नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अकराव्या पंचवार्षिक योजेअंतर्गत "सौर शहरे" विकसित करण्याचा कार्यक्रमाअंतर्गत ठाणे शहराची निवड केलेली आहे. त्या अंतर्गत महापालिका क्षेत्रात उर्जा कार्यक्षमता वाढविणे, शहरी भागात अपारंपारीक उर्जेचा वापर करण्याचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. त्यासाठी केंद्र शासनाने रु.५० लक्ष ची तरतूद केलेली असून प्रकल्प निहाय अनुदान अपेक्षित आहे.

ठाणे शहराचा "उर्जा सद्य स्थिती अहवाल" व हरितगृह वायु उत्सर्जन अहवाल तयार करणेत आला असून महापालिकेच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात आला आहे.

**६.२.२ सौर उर्जेचा वापर**

महापालिकेची विविध रुग्णालये व इमारतींवर ३५,५०० लिटर प्रतिदिन क्षमतेची सौर उर्जेवर आधारित पाणी गरम करण्याची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली

आहे. तसेच महापालिका क्षेत्रात १०० सौर दिवे, ६ सौर ट्रॅफिक सिग्नल, सौर पॉवर कार्यान्वित करण्यात आला आहे.

ठाणे महापालिकेच्या मुख्यालयात सौर उर्जेवर आधारीत ५० किलो वॅट क्षमतेची वीज निर्माण करणारी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथे सौरउर्जेवर आधारित मध्यवर्ती वातानूकुलन यंत्रणा सन २०११-१२ मध्ये पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात येईल.

आगामी आर्थिक वर्षात महापालिकेच्या इतर सौर उर्जेवर व पवन उर्जेवर आधारित विज निर्माण करणारी यंत्रणा बसविण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी रु. १.०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| **६.२.३** | **विज बचत उपाय योजना** | महापालिकेच्या विविध सेवेसाठी येणा-या विजेच्या वापरात बचत करण्यासाठी उर्जा कार्यक्षमता प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेचे पथदिप, महत्वाच्या इमारती, पाणी पुरवठा यंत्रणा इ. चे उर्जा लेखा परिक्षण करण्यात येणार आहे. हया कामासाठी रु.५० लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे. |
| **६.२.४** | **पथदिप व्यवस्थापक व विकास** | महापालिका क्षेत्रात नव्याने तयार होणा-या येणा-या रस्त्यावर, विविध वस्त्यांमध्ये तसेच नूतनीकरणांतर्गत विविध ठिकाणी आधुनिक पध्दतीचे उर्जा कार्यक्षम पथदिप लावण्यासाठी रु. ५ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. |
| **६.३** | **नविन ट्रॅफिक सिग्नल लावणे** | वाहतुकीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महापालिका क्षेत्रात वाहतुक पोलिसांच्या सल्ल्यानुसार ट्रॅफिक सिग्नलस लावण्यासाठी रु.२५ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. |

## ७. सामाजिक पायाभूत सुविधांची आणि सुखसोयींची दर्जोन्नती

| | | |
|---|---|---|
| ७.१ | **प्राथमिक शिक्षण** | महापालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ४०००० संख्या असून शिक्षक संख्या १३०० आहे. या विद्यार्थ्यांच्या विविध योजनांतर्गत रु.१२ कोटी तरतूद करण्यांत आली आहे. |
| ७.२ | **माध्यमिक शिक्षण** | |
| ७.२.१ | **शैक्षणिक दर्जामध्ये सुधारणा, गुणवत्ता विकास कार्यक्रम** | शाळांमध्ये संगणकीय प्रणालीद्वारे दृकश्राव्य माध्यमाद्वारे प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेसाठी रु.२ कोटी ५० लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे. |
| ७.३ | **आरोग्य आणि वैद्यकीय सुविधा** | |
| ७.३.१ | **उत्तम दर्जाच्या आरोग्य सेवा देणेबाबत** | पुढील वर्षी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय व अन्य सर्व प्रसुतीगृहे, रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्र या इमारतींची दुरुस्ती व नूतनीकरणासाठी आवश्यक तेवढ्या निधीची तरतूद करण्यात येत आहे. हया कामासाठी वर्ष २०१०-११ मध्ये रु.२.३५ कोटी तरतूद करण्यात आली होती, ती वाढवून पुढील वर्षी रु.१०.९८ कोटी ची करण्यात येत आहे. तसेच ठाणे महापालिकेच्या अखत्यारीमधील प्रसुतीगृहे, रुग्णालये, व प्राथमिक आरोग्य केंद्रे यामध्ये अद्यावयत व आधुनिक यंत्र सामुग्री उपलब्ध करुन देण्यासाठी वर्ष २०१०-११ मध्ये रु.४ कोटीची तरतूद करण्यात आली होती. पुढील वर्षी हया क्षेत्रात शहराची गरज लक्षात घेता तरतूद वाढवून रु.१५.३१ कोटीचा निधी प्रस्तावित करण्यात येत आहे. हया तरतूदीमधून **पुढील** प्रमाणे योजना कार्यान्वित करण्यात येतील. |

| | |
|---|---|
| **कोपरी प्रसुतिगृह** | कोपरी प्रसुतिगृहाचे नुतनीकरण झालेले असून सन २०११- १२ मध्ये त्याठीकाणी सुसज्ज असे ४० ते ५० खाटांचे प्रसुतिगृह सुरु होत आहे. त्याठिकाणी आवश्यकती यंत्रसामुग्री उदा. सोनोग्राफी मशीन, ऐक्सरे मशिन, सर्व प्रकारचे रक्त, लघवी तपासणे इत्यादी तपासण्या करणा-या सुविधा वाढविण्यांत येतील. |
| **डॉ.आ.गो जोशी रुग्णालय वर्तकनगर** | सन २०११-१२ मध्ये सध्याच्या रुग्णांलयाची दुरुस्ती अंतर्गत बदल यासह खाटांची संख्या वाढविणे, नवीन एक्सरे मशिन, सोनोग्राफी मशिन पुरवठा करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच शस्त्रक्रियागृहाचे सक्षमीकरण करुन शस्त्रक्रीया नियमित सुरु करणे येतील. |
| **नेत्र चिकित्सा विभाग** | नेत्र चिकित्सा विभागामध्ये अत्याधुनिक उपकरणे बसवण्यात येतील त्यामुळे नेत्रांच्या उच्च प्रतीच्या अवघड शस्त्रक्रिया सुरु करण्यात येतील. |
| **कॉर्नियल बॅन्क सुरु करणे** | कार्निअल बँक सुरु करण्यात येणार असून ज्या रुग्णाच्या डोळयातील बुबुळावर जखम होऊन Scar तयार होतात व त्यामुळे दृष्टीमध्ये अडथळा येणे दृष्टी कमी होणे येतो अशा रुग्णांना कार्निअल पुनर्रोपण करण्याचे नियोजीत आहे. |
| **इमारतीची दुरुस्ती व सुधारणा** | राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवजी महाराज रुग्णालय इमारतीचे क्षेत्रफळ जवळपास ४ लक्ष चौरस फुट आहे. सदर इमारत सन १९९१-९२ मध्ये बांधलेली आहे. इमारतीत मोठया प्रमाणात गळती आहे. इमारतीचे आयुष्यमान वाढविणेसाठी विभागनिहाय अंतर्गत सुधारणा, बिल्डींग ऑडीट व सुशोभिकरण तसेच परिसर सुधारणा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला |

आहे. यासाठी सल्लागार नियुक्ती करण्यात आलेली असून सन २०११-१२ मध्ये सर्व कामे पुर्ण करण्यात येतील. व रुग्णालयाचे बळकटीकरण करुन रुग्णांना उच्च सुविधा उपलब्ध करण्यात येतील.

**बालरोग कक्ष**

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील बालरोग कक्षामध्ये यापुर्वी ४०खाटांचा लहान मुलांचा कक्ष होता. त्यामध्ये वाढ करुन तो ६० खाटांचा निर्माण करण्यात येत आहे.

एकूण लहान मुलांच्या आरोग्यासाठी ९६ लहान मुलांच्या खाटांचे सुसज्ज बालरोग कक्ष नव्याने व नवजात बालक व १ महिन्याच्या बालकांसाठी कार्यान्वित करण्यात येत आहेत.

**एक्सरे कक्ष**

१५ ते २० वर्षापुर्वी खरेदी केलेल्या एक्सरे मशिन्स बदलण्यात येतील व त्यामध्ये ८०० एम.एम. व ५०० एम.एम या उच्च दर्जाच्या दोन एक्सरे मशिन्स यांना सी.आर सिस्टीम (Computer Radio Graphy System) जोडण्यात येईल. यामुळे कमीत कमी खर्चात रुग्णांना एक्सरे उपलब्ध होतील.

**3 D & 4D इकोसिस्टीम व ॲडव्हान्स सोनोग्राफी मशीन्स**

३ D& ४D इकोसिस्टीम व ॲडव्हान्स सोनोग्राफी मशीन्स सध्या उपलब्ध नाहीत. त्यामध्ये रुग्णाच्या विविध अंतर्गत अवयवांची तपासणी याद्वारे करण्याचे नियोजीत आहे. त्यामुळे हृदयाशी, फुफ्फुस, किडणी व पोटातील इतर अवयव संबंधित व अंतर्गत अवयवाच्या तपासण्या करण्यात येतील.

| | |
|---|---|
| **पॅथॉलॉजी व मायक्रोबायलॉजी तपासण्यांच्या सुधारणा** | रक्त, लघवी, पेशी, तपासण्या करण्यासाठी सध्या संपूर्ण क्षमतेच्या प्रयोगशाळा यंत्रणा उपलब्ध नाहीत त्यामुळे काही तपासण्या बाहेरुन (खाजगी) प्रयोग शाळेकडून करण्यात येत होत्या यात सुधारणा करुन सर्व प्रकारच्या तपासण्या एकाच ठिकाणी करण्यात येतील. |
| **सौ.मिनाताई ठाकरे प्रसुतीगृह सुधारणा** | सदर प्रसुतीगृहाचा विस्तार व सक्षमीकरण करुन किमान ५० खाटांची व्यवस्था करणे, एक्सरे सुविधा पॅथॉलॉजी लॅब सक्षमीकरण, सोनोग्राफी सुविधा व शस्त्रक्रिया गृहाची सुधारणा व तज्ञांच्या संख्येत वाढ करणेत येईल. |
| **रक्तपेढी सुधारणा** | सध्या फक्त रक्तदानाच्या मध्यमातून रक्त साठवणूक करण्यात येते. व रक्तगट तपासण्या करुन रुग्णांना पुरवठा केला जातो. सदरची सुविधा यामध्ये सुधारणा करुन रक्त विघटन प्रणाली (Blood Component Separation Unit) उभारण्यात येईल. व यामुळे रक्ताचे विविध घटक साथरोग विविध शस्त्रक्रिया, अपघातातील जखमी रुग्णांना पुरवठा करण्यात येईल. |
| **शस्त्रक्रिया कक्षाचे सक्षमीकरण** | महापालिकेच्या सर्व शस्त्रक्रियागृहामध्ये सध्याची असलेली प्रकाश व्यवस्था बदलून आधुनिकीकरण करुन प्रकाश व्यवस्था उपलब्ध करण्यात येईल. |
| **व्हिडीयो एन्डोस्कोपी सुविधा** | सदरची सुविधा सध्या उपलब्ध नाही. ही सुविधा नव्याने बसविण्यात येईल व यामुळे पोटातील, फुफ्फुसातील अंतर्गत अवयवांचे निदान व शस्त्रक्रिया सहज व सोप्या पध्दतीने होतील. |

**श्रीमती निर्मला देवी दिघे नर्सिंग होम व लोकमान्य टिळक रुग्णालय**

सदरची इमारत या पुर्वी बांधून तयार आहे. वर्ष २०११-१२ मध्ये ५० खाटांचे रुग्णालय व प्रसुतीग्रह सेवा २४ तास सुरु करण्यात येतील.

**रुग्णालये बांधकाम व दुरुस्ती**

मुंब्रा येथे बांधा वापरा व हस्तांतरीत करणे (BOT) या तत्वावर रुग्णालय उभारण्यात येत आहे. किमान १०० खाटांचे रुग्णालय सन २०११-१२ मध्ये निर्माण करण्याचा मानस आहे.

७.३.२ **राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय**

राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये एम.बी.बी.एस. विद्यार्थी प्रवेश क्षमता सध्या ६०विद्यार्थ्यांसाठी आहे. ती वाढवून १०० विद्यार्थ्यांची प्रेवश क्षमता करण्यात येत आहे.

वैद्यकीय महाविद्यालय याकडील १५ विविध विषयामध्ये पदवी व पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यात येईल त्यामुळे वैद्यकीय तज्ञांकडून रुग्णांना उच्च प्रतीच्या आरोग्य सेवा उपलब्ध होतील.

१०० विद्यार्थी क्षमतेसाठी आवश्यक **असलेले** वैद्यकीय तज्ञ यामध्ये आवश्यक अध्यापक वर्गाची पदे निर्मिती भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानांकनानुसार निर्माण करण्यात येतील.

## ८. शहराचे सुशोभीकरण आणि सांस्कृतिक/पर्यटन स्थळांचा विकास :

८.१ **मासुंदा तलाव येथे लेझर शो**

ठाणे शहरास स्वतःचा एक इतिहास असून ठाण्याची ओळख आंतरराष्ट्रीय स्तरावर होणेसाठी तसेच ठाणे पर्यटन स्थळ म्हणून ओळखण्यासाठी ठाणे शहराच्या विविध बाबींच्या प्राचीन इतिहास शहरातील नागरिक बाहेरुन येणा-या पर्यटकांना होणेसाठी मासुंदा तलाव

| | | |
|---|---|---|
| | | परिसरात पाण्याच्या पडदयावर लेझरशो विकसित करणेंत येणार असून या लेझर शोद्वारे ठाण्यातील प्राचीन इतिहास उदा.कोपीनेश्वर मंदिर ठाण्यातील मध्यवर्ती कारागृह पुर्वीच्या किल्ला, तलाव इ.बाबींवर तसेच आता विकसित होत असलेले ठाण्याचे विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकण्यांत येतील. हया प्रकल्पासाठी रु. १ कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. |
| ८.२ | **दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे बर्फातील स्केटींग तयार करणे(Ice Skating)** | ठाणे महापालिका क्षेत्रातील नागरीकांसाठी व विशेषतः मुलांसाठी सुविधा म्हणून दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे बर्फातील स्केटींग (Ice Skating) BOOT मार्गाने सुरु करण्याबाबत पुढील वर्षात कार्यवाही करण्यात येईल. |
| ८.३ | **BOOT मार्गाने निसर्ग उद्यानात Tethered Helium Balloon ची आकर्षक सुविधा उभारणे** | निसर्ग उद्यान विकासकांकडून विकसित करण्यात आले असून सध्या हया उद्यानाची देखरेख चांगली होत नाही, म्हणून त्या ठिकाणी BOOT मार्गाने Tethered Helium Balloon ची सुविधा निर्माण करण्यात येतील. हे पर्यटकांचे आकर्षण तर ठरेलच, शहराच्या नागरिकांना सुध्दा ३०० ते ५०० फुट उंचीपासून ठाणे शहराचा व संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे दर्शन शक्य होऊ शकेल व त्यासोबत उद्यानाच्या देखरेखीवर खर्चाची बचत व महानगरपालिकेला यातून उत्पन्न ही होणे अपेक्षित आहे. असा प्रयोग महाराष्ट्रात प्रथमच असणार आहे. |
| ८.४ | **ठाणे नाटय संकुल, वर्तकनगर** | हिरानंदानी मिडोज येथे १२०० आसन क्षमता असलेले मुख्य नाटयगृह व २०० असान क्षमता असलेले प्रायोगिक नाटकांकरीता नाटयगृह बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून सदर इमारतीमध्ये या व्यतिरीक्त कनव्हेंन्शनल सेंटर, पार्किंग इमारत, ॲम्फी थिएटर |

इत्यादी सुविधा करण्यात येत आहेत. सदरचे काम ऑक्टोबर २०११ पर्यंत पुर्ण करण्याचा व नाटयगृह सुरु करण्याचा मनोदय आहे. येथे विद्युतीकरणाच्या कामासाठी रु.३ कोटीची तरतूद करण्यात येत आहे.

८.५ **मत्स्यालय बांधणे** ’बांधा, वापरा व हस्तांतरित करा’ (BOOT) धर्तीवर ज्यूपिटर हॉस्पिटलचे शेजारी पब्लिक ॲमेनिटीच्या जागेवर एक अद्ययावत मत्स्यालय बांधणे नियोजित असून याबाबत कार्यवाही पुढील वर्षात करण्यात येईल. हया प्रकल्पातून महानगरपालिकेला भविष्यात उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे.

## ९. आपत्कालीन व्यवस्थापन आणि आपत्कालीन व्यवस्थेच्या पूर्व तयारीमध्ये सुधारणा

९.१ **आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष** या अंतर्गत ठाणे शहराकरीता आधुनिक स्वयंपुर्ण व निर्दोष संपर्क यंत्रणा विकसित करणे, व्हिडीओ कॉन्फरन्सींगची सुविधा बाबत कार्यवाही प्रस्तावित आहे.

Emergency Operation Center प्रभाग समिती निहाय स्थापन करणेत आलेले असून, ते अद्ययावत करण्याचे काम पुढील वर्षात घेण्यात येईल.

हया कामासाठी रु.३.२५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

९.२ **अग्निशमन केंद्राची उभारणी** ठाण्याची वाढत जाणारी लोकसंख्या तसेच वाढत जाणाऱ्या वस्त्या पाहता अगिनशमन विभाग मजबुतीकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे ओवळा येथे " बांधा वापरा व हस्तांतरीत करा " या तत्वावर अग्निशमन केंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. तसेच दिवा येथे नविन अग्निशमन केंद्र बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर लेखाशिर्षाअंतर्गत एकूण तरतूद रु.२.५०

कोटी प्रस्तावित करण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी लागणारे टर्न टेबल लॅडर हे वाहन खरेदी करावयाचे असून सदर वाहन ३२ मिटर उंचीपर्यंत कार्यान्वित होणार आहे. यासाठी रक्कम रु.७.५० कोटी तरतूद करण्यात आली आहे. अग्निशमन विभागासाठी वॉटर टेंडर २, इमर्जन्सी रेस्क्यू टेंडर २, टोविंग व्हेईकल ३ अशी खरेदी करणे प्रस्तावित आहे. यासाठी रु.१२.५० कोटी तरतूद अग्निशमन दलासाठी करण्यात आली आहे.

## १०. समाज कल्याण

### १०.१ मागासवर्गीय कल्याण

मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी अर्थसंकल्पात महसुली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता उर्वरित रकमेच्या ५% इतका राखीव निधी ठेवण्यात येतो. या रकमेतून मागासवर्गीय वस्त्यांमध्ये विविध मुलभूत सुविधा पुरविण्यात येतात. उदा.रस्ते, पाणी पुरवठयाची कामे, शौचालये बांधणे, अभ्यासिका बांधणे इत्यादी करण्यात येते.

तसेच सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसाय प्रशिक्षण, उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य, शिष्यवृत्ती, सायकली पुरविणे, अपंगांना शिष्यवृत्ती, क्रीडा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, बेरोजगार युवकांना वादन साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य अशा स्वरुपाच्या योजना प्रस्तावित आहेत.

यासाठी अर्थसंकल्पात रु.४१ कोटी रकमेची तरतूद प्रस्तावित आहे.

| | | |
|---|---|---|
| **१०.२** | **महिला व बालकल्याण** | हया विभागामार्फत विधवा महिलांना अर्थसहाय्य, नोकरी करणा-या महिलांसाठी पाळणाघराची सेवा उपलब्ध करुन देणे, उच्च शिक्षणासाठी परदेशात जाणा-या महिलांना अर्थसहाय्य देणे, राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महिला खेळाडूंना त्यांच्या प्रशिक्षणाकरीता अर्थसहाय्य करणे, महिलांना त्यांच्या संसाराला हातभार लावण्याकरीता शिलाई मशिन वाटप करणे, सदरचे शिलाई मशिन चालविण्याचे प्रशिक्षण देणे इ. योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजनेतून महिलांचे सक्षमीकरण व सबलीकरण होण्याच्या दृष्टीने सर्वतोपरी सहाय्य करण्यात येते व त्यांना स्वावलंबी करण्याचा महापालिकेचा मानस आहे. या कामी रु.८ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.<br>महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील मुलींची उपस्थिती वाढविण्याकरीता त्यांना प्रोत्साहनपर भत्ता प्रती दिन रु.१/- प्रमाणे देण्यात येत आहे. हयासाठी रु.१ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. |
| **११.** | **जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियान** | |
| **११.१** | **एकात्मिक नाले विकास प्रकल्प टप्पा - १, २, ३** | एकात्मिक नाले विकास प्रकल्प टप्पा १, २ व ३ मार्च २०११ अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. |
| **११.२.१** | **भुयारी गटार योजना टप्पा १,२ व ३** | टप्पा क्र.१ व २ अंतर्गत प्रत्येकी २ निविदा व टप्पा क्र.३ अंतर्गत १ निविदा अशा एकूण ५ निविदांतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत. प्रस्तुत प्रकल्पाच्या टप्पा क्र.१ अंतर्गत ८०%, टप्पा क्र.२ अंतर्गत ३२% व टप्पा क्र.३ अंतर्गत ५३% एवढी भौतिक प्रगती झालेली असून अनुक्रमे रु.१०१ कोटी, रु.१८ कोटी व रु.१०.४८ कोटी इतका प्रत्यक्षात खर्च झालेला आहे. पुढील वर्षी ही सर्व कामे पूर्ण होतील अशी अपेक्षा आहे. |

| | | |
|---|---|---|
| ११.२.२ | **भुयारी गटार योजना टप्पा-४** | भुयारी गटार योजना टप्पा ४ अंतर्गत ठाणे महापालिका क्षेत्रातील दिवा व घोडबंदर रोड (मानपाडया पासून गायमुख) पर्यंत या कामाचा समावेश करण्यात येणार असून त्याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुर आहे. तसेच सदर योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे. |
| ११.३ | **बी.एस.यु.पी. टप्पा-१ व २** | ठाणे महापालिका हद्दीमध्ये झोपडपट्टी वासियांचे राहणीमान सुधारणा होऊन त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी शहरी गरीबांना मुलभूत सेवा ही योजना चालविली जात आहे. सदरच्या प्रकल्पातील टप्पा क्रमांक १ अंतर्गत प्रस्तावित सदनिका ९४२६ पैकी ६१५ सदनिका तयार असून लवकरच सदर सदनिकेच्या हस्तांतरण सुरुवात करण्यांत येईल व डिसेंबर २०१२ अखेर ४३०३ सदनिका पूर्ण करण्याचा मानस आहे. सन २०११-१२ करीता रु. ७० कोटी तरतूद करण्यांत आलेली आहे.<br>टप्पा क्रमांक २ : सदर प्रकल्पांतर्गत ८२२ सदनिका बांधण्यांत आलेल्या आहेत. सदर प्रकल्प मार्च २०११ पर्यंत पूर्ण होणार असुन मार्च २०११ मध्ये सदनिकांचा हस्तांतरणास सुरुवात करण्यांत येईल. सन २०११-१२ करीता रु.३ कोटी तरतूद करण्यांत आलेली आहे. |
| ११.४ | **परिवहन सेवा बस खरेदी** | ठाणे महापालिकेच्या माध्यमातून परिवहन सेवेकरीता JNNURM अंतर्गत २०० बसेस खरेदी करण्यांत आलेल्या आहेत. सदरच्या बसेस एप्रिल २०१० ते जाने.२०११ या दरम्यान परिवहन सेवेच्या बस ताफ्यात दाखल झाल्या असून त्या मार्गावर कार्यरत आहेत. याबाबत जी.पी.आर.एस. यंत्रणा बसविणे, संगणकीकरण, जाहीराती, उत्पन्नवाढ इ. ही कार्यवाही |

करण्यात येईल. यासाठी रु.१८.१४ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

| | | |
|---|---|---|
| **१२.** | **भविष्यकालीन योजना (Transformative Investments)** | ठाणे शहराच्या पुढे होणा-या विकासाच्या दृष्टीकोनातून काही योजना/प्रकल्प महत्वपूर्ण असल्याने या सर्व प्रकल्पांच्या बाबतीत सुसाध्यता अभ्यास (Feasibility Study) करण्याचे प्रस्तावित करण्यात येत असून त्यासाठी आवश्यक त्या पुढील कार्यवाही वर्ष २०११-१२ मध्ये करण्यात येतील. |
| **१२.१** | **मोनोरेल प्रकल्प** | भविष्यकाळाची गरज लक्षात घेता ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मोनोरेल नियोजनासह त्याचे दुतर्फा सुमारे १०० मी. अंतरापर्यंत हाय डेन्सिटी कॉरीडॉर्स निर्माण करण्यासाठी व आवश्यक नियोजन व आराखडे तयार करणेकरीता सविस्तर अभियांत्रिकी अभ्यास करणे गरजेचे आहे. यासाठी रु.२५ लक्ष तरतूद करण्यांत आली आहे. |
| **१२.२** | **ठाणे बायपास रोड** | ठाणे शहरातील वाढती लोकसंख्या व झपाट्याने होणारा सर्वांगीण विकास व होणा-या वाहनांची दैनंदिन स्वरुपातील प्रचंड वाढ या सर्व बाबी विचारात घेऊन मंजूर आराखडयातील सुमारे १९.५ कि.मी. लांबीचा ठाणे शहराला खाडीलगत असलेल्या बायपास रस्त्याचे निर्माण होणे ही काळाची गरज असून अवजड वाहतूकीच्या नियमनाच्या दृष्टीकोनातून अत्यंत आवश्यक आहे. जे.एन.पी.टी., ऐरोली इ. कडून येणारी अवजड वाहतूक ही या बाहयवळण रस्त्याने शहराच्या बाहेरुन गुजरातच्या दिशेने वळविता येईल.<br>सदर बाहयवळण रस्त्याच्या कामाचे संपूर्ण नियोजन करणे - प्लेन टेबल सर्व्हेक्षण, पुनर्वसनाबाबत कार्यवाही |

व सदरचा प्रकल्प टोल वसूलीच्या माध्यमातून प्रस्तावित करण्याचा महापालिकेचा मानस आहे. प्रस्तावित कामासाठी रु.१० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**१२.३ शॅलो वॉटर पार्क व पिकनिक स्पॉट**

ठाणे शहराला सर्वसाधारणपणे २३ कि.मी. लांबीचा खाडी किनारा लाभलेला आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात विकास योजना सेक्टर नं.६ मध्ये भाईंदरपाडा येथे २१.०५ हेक्टर क्षेत्रामध्ये पिकनिक स्पॉट आरक्षण क्र.१, मोघरपाडा येथे १५७ हेक्टर क्षेत्रामध्ये पिकनिक सेंटर आरक्षण क्र.२ व वडवली येथे ४१ हेक्टर क्षेत्रामध्ये शॅलो वॉटर पार्क आरक्षण क्र.३ अशी आरक्षणे ठेवण्यात आलेली आहे. ही आरक्षणे मोठ्या क्षेत्रफळाची असून, ही आंतरराष्ट्रीय दर्जाप्रमाणे विकसित करणे शक्य आहे. उपरोक्त नमूद शॅलो वॉटर पार्क आरक्षणाचा पावसाळयात होल्डींगपॉन्ड म्हणून वापर होऊ शकेल.

ही बाब विचारात घेऊन प्रशासनाने खाडीच्या पर्यावरणाचा व ही सर्व आरक्षणे विकसित करण्याच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविण्यात आली असून मंजूरीची प्रक्रिया सुरू आहे. हा अभ्यास या मोठ्या प्रकल्पाचा पायाभूत अभ्यास असेल. यासाठी रु.२५ लाखांची तरतूद करण्यात येत आहे.

**१२.४ नवीन ठाणे रेल्वे स्थानक**

भविष्यात ठाणे रेल्वे स्टेशनवरील प्रवासी वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी व नव्याने विकसित होणा-या मोनोरेल व मेट्रो प्रकल्पाचा विचार करुन मनोरुग्णालयाजवळ नव्याने लोहमार्ग स्थानक "बांधा वापरा व हस्तांतरीत करा" या तत्वावर विकसित करण्याबबत प्रस्तावित असून या प्रकल्पाचे अनुषंगाने

| | | |
|---|---|---|
| | | आवश्यक सल्लागार नेमून सर्वेक्षण करणेसाठी अर्थसंकल्पात रु.१० लक्ष ची तरतूद करण्यांत आली आहे. |
| १२.५ | **खाडी किनारा वॉटर फ्रन्ट विकास** | ठाणे महानगरपालिका क्षेत्रात २३ कि.मी. लांबीचा खाडी किनारा असून या किना-यावरील ठिकठिकाणी असलेली अतिक्रमणे काढून तेथे खाडी पर्यावरण पुरक झाडे व मॅनग्रोव्हज लावणे, पर्यावरण मैत्रीशील उपक्रम आखणे व या जागा संरक्षित करण्याचा महापालिकेचा मानस आहे. यासाठी रु.२५ लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे. |
| १२.६ | **अर्बन रिसर्च सेन्टर (नागरी संशोधन केंद्र)** | महाराष्ट्र राज्य देशाचा सर्वात जास्त शहरीकरण झालेल्या राज्यांपैकी एक आहे. हया राज्यात शहरांच्या भविष्यकालीन विकासाच्या दृष्टीकोनातून एक 'नागरी संशोधन' केंद्राची आवश्यकता भासते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर शहर विकासाच्या क्षेत्रात होत असलेले चांगले प्रयोग (Best Practices), अभ्यास, संशोधन इ. बाबत एकास्थानी सध्या माहिती सहजासहजी उपलब्ध होत नाही. म्हणून या विषयाशी संबंधित एक सुसज्ज पुस्तकालय (Knowledge Storehouse) व अद्ययावत माहिती उपलब्ध करुन ठाणे शहरात पोखरण रोड नं. २ येथे महापालिकेच्या तयार वास्तुमध्ये नागरी संशोधन केंद्र (Urban Reaserch Centre) ची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी रु. ८० **लक्ष** रुपये तरतूद करण्यांत आली आहे. सदरचे नागरी संशोधन केंद्र हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानकानुसार असेल त्यामध्ये मिटींग हॉल, रिडींग रुम इंटरनेट इत्यादी सुविधा असतील. नागरिकांना वैयक्तीक मेंबरशिप व अन्य महापालिकांना संस्थागत सदस्यता दिली जाईल. व सदरची फी |

कलेक्शन ठाणे महानगरपालिकेकडुन करण्यात येईल. याबाबतीत विस्तृत योजना तयार करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १२.७ | **घोडबंदर लगत ठाणे खाडी येथे पक्षी अभयारण्य विकास व पक्षी प्रेमी पर्यटकांच्या साठी सोय** | ठाणे शहरातील पर्यावरण व पर्यटन विकास करण्याच्या दृष्टीने वन विभागाचे सहकार्य घेऊन पक्षी अभयारण्य तयार करण्याचा मानस आहे. त्यामुळे नैसर्गिकरित्या या परिसरातील येत असलेल्या विविध पक्ष्यांना योग्य ते वातावरण मिळण्यास व त्यामधून नैसर्गिक पक्षी पार्क तयार करुन पर्यटन विकासही होईल व एक करमणूक केंद्र कोकण परिसरात होईल असे वाटते. याचा अभ्यास करण्यासाठी रु.२५ लाखांची तरतूद करण्यात येत आहे. |

**आभार :**

मा.पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखाली जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान व सार्वजनिक रिन्युवेबल एनर्जी व सोलर सिटी व अन्य कार्यक्रमांचे माध्यमातून ठाणे शहराचे विकासासाठी चालना देण्यासाठी केंद्र शासनाने जे योगदान दिले, त्याचे कृतज्ञता पूर्वक आभार मानतो.

त्याचप्रमाणे मा. मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, त्यांचे सर्व सहकारी, मा.उपसभापती महाराष्ट्र विधान परिषद, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मा.खासदार, मा.आमदार मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महानगर आयुक्त आणि विशेषतः नगर विकास विभाग व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मा.प्रधान सचिव तसेच शासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल विशेष आभारी आहे.

ठाणे शहराच्या सर्वागींण विकास प्रक्रियेत पुरोगामी धोरणात्मक निर्णय घेऊन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मला आणि माझ्या सहकारी अधिका-यांना सतत मार्गदर्शन करीत असलेले मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्षनेते, सर्व पक्षीय मा.गटनेता व सर्व नगरसेवक व सर्व पक्षांचे मा.लोकप्रतिनीधी यांचे मनःपुर्वक आभार व्यक्त करतो.

ठाणे महानगरपालिकेच्या या सर्व कार्यक्रम अंमलबजावणीसाठी सक्रीय सहभागी असलेले व सांघिक वृत्तीने काम करणारे अधिकारी व कर्मचारी तसेच कर्मचारी संघटना यांचेदेखील मी आभार मानतो. तसेच सदर अर्थसंकल्पीय कामकाजासाठी ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी बहुमोल सहकार्य केले आहे त्यांचे आभार मानतो.

या पार्श्वभूमीवर सादर केलेल्या या अर्थसंकल्पीय अंदाजाद्वारे प्रस्ताविण्यात आलेल्या कामांना/प्रकल्पांना मूर्त स्वरुप प्राप्त झाल्यावर ठाणे महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करण्याची प्रक्रीया अधिक गतिमान होईल असा मला विश्वास आहे. त्या दृष्टीने आपला सहभाग व अंतःकरणपुर्वक सहकार्य लाभेल अशी आशा बाळगून आगामी वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिलकी अर्थसंकल्पीय अंदाज मा.स्थायी समितीच्या विचारविनिमयार्थ व मंजुरीसाठी सादर करीत आहे.

सस्नेह धन्यवाद !

आर. ए. राजीव

फेब्रुवारी ११, २०११ महापालिका आयुक्त